# जिल्हा परिषद, हिंगोली
## बांधकाम विभाग

Office : 02456-223066
Fax : 02456-221938
Email : zphingoli.ee@mahapwd.com


जिल्हा परिषद हिंगोली
"ई " लिलाव सूचना क्र. 01 ( पहिली वेळ )
सन 2018-19

जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत असलेली एकुण 07 जुनी निर्लेखीत वाहने आहे त्या स्थितीत आहे त्या ठीकानाहुन ई- लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. इच्छूक लिलावदारांचे सहभागा करीता सदर सूचना प्रसिध्द करण्यात येत असून त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर लिलाव प्रक्रिया लॉट निहाय स्वतंत्रपणे करण्यात येत आहे. एका लॉट मध्ये दर्शविलेली सर्व वाहन/यंत्रसामुग्री घेणे बंधनकारक राहील.

लॉट क्र.1 - जीप -02 व कार (अंबेसेटर) -01 एकुण. 03 वाहन
लॉट क्र.2 - कार (ॲबेसेटर) -04 एकुण. 04 वाहन

1) जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत असलेली जिल्हा परिषद च्या मालकीची - 07 निरुपयोगी वाहने ई-लिलावाव्दारे विक्री करावयाची असून विक्री करावयाच्या वाहनाचा संक्षिप्त तपशील WWW.eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
2) ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावदारांना eauction.gov.in या संकेतस्थळावर जाऊन पात्रता मिळवणेसाठी आवश्यक दस्तऐवजाची ऑनलाईन पूर्तता करावी लागेल. तसेच त्याबाबत आवश्यक ऑक्शन फीस व सुरक्षाअनामत रक्कम इत्यादींची पूर्तता करावी लागेल.
3) इच्छूक लिलावदारांची दस्तऐवज व अन्य बाबतची पडताळणी करुन त्यांना प्रत्यक्ष लाईव्ह ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होणेसाठी पात्र करण्यात येईल. केवळ पात्र लिलावदारांना या लाईव्ह ई-ऑक्शन मध्ये सहभागी होता येईल.
4) सदर बाबत अधिक तपशीला करीता निम्न नमूद कार्यालयाकडे इच्छूक लिलावदारांना चौकशी करता येईल.

अ) कार्यकारी अभियंता (बां )
जिल्हा परिषद हिंगोली
दुरध्वनी क्र. 02456-223066

5) इच्छूक लिलावदारांना दि. 30 / 01 /2019 वेळ 13.00 ते दि. 08 / 02 /2019 वेळ 16.00 या कालावधीत eauction.gov.in या संकेतस्थळावर आवश्यक बार्बीची ऑनलाईन पध्दतीने पूर्तता करता येईल.
6) सदरील ई-लिलाव सूचनेबाबतचा अधिकचा तपशील WWW.eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सदस्य (निर्लेखन समिती) तथा उप अभियंता (यां) जि.प. (यां) उप विभाग हिंगोली | सदस्य (निर्लेखन समिती) तथा कार्यकारी अभियंता (बां ) जिल्हा परिषद हिंगोली | सदस्य (निर्लेखन समिती) तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली | सदस्य (निर्लेखन समिती) तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली | अध्यक्ष (निर्लेखन समिती) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली |

# जिल्हा परिषद, हिंगोली
## बांधकाम विभाग

Office : 02456-223066
Fax : 02456-221938
Email : zphingoli.ee@mahapwd.com


जाक्र/जिपहि/बांध/वाहन/कावी/ २२० /19 दिनांक :- २४ / ०1 /2019

प्रति,

1. दैनिक पुण्यनगरी (मराठी)
2. दैनिक लोकमत टाईम्स (इंग्रजी)

**विषय - ई लिलाव सूचना क्र. 01 ( पहिली वेळ ) सन 2018-19 ही जाहिरात वर्तमाण पत्रामध्ये प्रसिध्द करणे बाबत.**

संदर्भ :- उप सचिव ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र झेडपीए 2006/ प्र.क्र.366 /वित्त-9 मंत्रालय मुंबई दिनांक 31 डिसेंबर 2009

या पत्रा सोबत जोडलेली जाहिरात ई लिलाव सूचना क्र. 01 ( पहिली वेळ ) सन 2018-19 वरील संदर्भिय शासन परिपत्रकाचे अनुषंगाने जाहिरात प्रसिध्द करण्या बाबत दिलेले सुचनेनुसार आपल्या वृत्तपत्राच्या दिनांक- ३० / 1 /2019 रोजीच्या अंकात एकदाच ..108.. चौ से मी या आकारात जिल्हास्तरावर,विभागस्थर (मराठवाडा) प्रसिध्द करावी आणि त्या वर्तमानपत्राची एक प्रत त्याच दिवशी न चुकता या कार्यालयास पाठविली जाईल याची काळजी घेण्यात यावी .

1.जाहिरातीसाठी सूचनेपेक्षा जास्त जागा वापरल्याचे दिसुन आल्यास तिच्या बाबतीत फक्त योग्य आकाराचेच देयक अदा करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

2.जाहिरात प्रसिध्द करताना जाहिरातीचा मथळा प्रधिकाऱ्याचे नांव व त्यांचे पद यासाठी 14 टाईपचा वापर करण्यात यावा तर इतर मजकुरा साठी 12 चा टाईप वापरण्यात यावा.

3.जाहिरात योग्य प्रकारे प्रसिध्द न झाल्यास प्रसिध्द करताना चुका झाल्यास आपणास आपल्या प्रसिध्द होणाऱ्या दुसऱ्या अंकात चुकीची दुरुस्ती मोफत छापावी लागेल.

4.जाहिरात ठरवुन दिलेल्या तारखेलाच प्रसिध्द करणे आवश्यक आहे.त्या तारखेला जाहिरात प्रसिध्द न झाल्यास देयकाची रक्कम अदा करण्यात येणार नाही.

5.जाहिरातीचे आपल्या भाषेत भाषांतर करावयाचे झाल्यास ते आपणास विनामुल्य करावे लागेल.

6.जाहिरातीचे देयक आदेशाचा क्रमांक दिनांकासह शासनमान्य दराने दोन प्रतित तयार करावे व कार्यकारी अभियंता(बांध) जि प हिंगोली यांचेकडे पाठविण्यात यावी.

7.आपल्या वृतपत्रात संबंधित जाहिरात प्रसिध्द करताना ती वाचकांच्या चटकन लक्षात येईल अशा योग्य जागी सुबक व सुस्पष्ट मजकुरासह प्रसिध्द करावी.

8.जाहिरात पुरवणी पानावर न छापता मुळ अंकाच्या पृष्ठावर छापावी.

9.जाहिरात प्रकाशन दिलेल्या मुदतीपुर्वी करणे शक्य नसेल तर त्यासाठी या कार्यालयाची पुर्वसंमती असणे आवश्यक आहे . विहित दिनांका नंतर जाहिरात प्रसिध्द झाल्यास देयक अदा करण्यात येणार नाही.

10.सदरील जाहिरातीचा आकार .108.. चौ.सेमी मध्ये छापावा जाहिरात प्रकाशनात मुद्रणालय व इतर दोष आढळल्यास अथवा दिलेले दिनांकास जाहिरात न छापल्यास आवश्यकते पेक्षा जास्त आकारात जाहिरात छापल्यास अशा देयकांची अदाई करण्यात येणार नाही.

सोबत :- जाहिरात

कार्यकारी अभियंता (बांध)
जिल्हा परिषद हिंगोली

प्रतिलीपी- 1.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि प हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
2.मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि प हिंगोली यांना माहिता व कार्यवाहीस्तव सादर.
3) मा. राष्ट्रीय सुचना विज्ञान अधिकारी (NIC), हिंगोली यांना सादर करुन विनंती करण्यात येते की सदर जाहिरात हिंगोली जिल्ह्याच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (बांध)
जिल्हा परिषद हिंगोली